Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

March- 2024

ISSUE No - (CDLXIII) 463

## 75th Years of Indian Economy: Achievements and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. R. K. Shanediwan
Principal
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

**Editor**
Prof. Dr. Mrs. S. S. Rathod
Head, Deptt. of Economics,
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

1889

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with ACE Scanner

| | | |
|---|---|---|
| 56 | उच्च शिक्षणातील सल्लागार, मार्गदर्शक, दीपस्तंभ: प्रा. सुधाकर मानकर सर. डॉ.पांडुरंग बाळकृष्ण पाटील | 268 |
| 57 | भारत में खेल विकास के लिए योजनाएँ **Capt. Dr. Prashant Bibhishan Patil** | 271 |
| 58 | आजाद भारत की आर्थिक विषमता और जनवादी कवि 'धूमिल' प्रो.डॉ.सरोज पाटील | 273 |
| 59 | आर्थिक विपन्नता के परिप्रेक्ष्य में उपन्यास 'बरखा रचाई' प्रा. डॉ. सारिका राजाराम कांबळे | 277 |
| 60 | भाषा प्रौद्योगिकी : चिंतन और रोजगार डॉ. अक्षय राजेंद्र भोसले | 280 |
| 61 | Regional Trend Of Milk Production In Maharashtra State Aishwarya Hingmire **Mayur Goud, Dr. D. L. Kashid -Patil Dr. N. D. Kashid- Patil** | 285 |
| 62 | Micro Study of Demographic Characteristics of Gaganbavda Tehsil in Kolhapur District **Mr. Shubham Tanaji Patil, Dr. D. L. Kashid-Patil** | 290 |
| 63 | Impact Of Marxism On English Literature **Mrs. S. K. Desai** | 299 |
| 64 | Charting the Course: Navigating Challenges and Opportunities in India's Economic Development Landscape **Ms.Komal Suresh Jagtap** | 301 |
| 65 | कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक शेतीक्षेत्रातील मृदा परीक्षणाचा चिकित्सक अभ्यास प्रा. गौरव काटकर,डॉ. सौ. एन. डी. काशिद-पाटील,प्रा. तेजस चव्हाण | 305 |
| 66 | Representation of Economic Disparity and its Implications in Indian Society as Depicted in Indian English Literature **Dr.Rajkiran Jotiram Biraje** | 310 |
| 67 | An Overview of the Digital Financial Transaction Services in India **Dr. Anil Kolape** | 314 |
| 68 | Exploring Land Use Pattern in Western Maharashtra: Past, Present and Future Landscape **Dr. P. S. Kamble1, Atul J. Rajguru, Dr. Dada Nanaware** | 318 |


Scanned with ACE Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

# उच्च शिक्षणातील सल्लागार, मार्गदर्शक, दीपस्तंभ: प्रा. सुधाकर मानकर सर.

डॉ.पांडुरंग बाळकृष्ण पाटील
, ग्रंथपाल श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर ,मोबाईल नंबर ९२७२४७४,
e-mail: librarianshahaji@gmail.com

**सारांश:**

गेल्या पन्नास वर्षात उच्च शिक्षणातील विविध प्रश्नांवरील लढ्यात अग्रभागी असणारे, जागतिक प्राध्यापक महासंघाचे पाच वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम केलेले, अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोग आणि मानव संसाधन मंत्रालयाला मार्गदर्शन केलेले, वाणिज्य शाखेतील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी 165 पुस्तकांचे लेखन करणारे लेखक व उच्च शिक्षणातील विविध शासकीय अध्यादेश मिळवून 24 पुस्तकांचे संपादन करून महाराष्ट्र,देशातील प्राध्यापकांना, विद्यापीठ स्तरावरील अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्राचार्य, प्रा. सुधाकर मानकर सर होय. त्यांनी उच्च शिक्षणामध्ये 39 वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा बजावली. वयाच्या 75 व्या वर्षातही ते उच्च शिक्षणातील विविध प्रश्नांवर मोफत सल्ला देण्याचे काम अखंड आणि निरपेक्षपणे करत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग मंत्रालयातील सचिवापासून ते अनेक कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, हजारो विद्यार्थ्यांना झालेला आहे. त्यांच्या वयास नुकतीच 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यांच्या कार्याचा परिचय नव्या पिढीला निश्चितच मार्गदर्शक ठरेल,यासाठी हा लेखन प्रपंच

शोध संज्ञा:UGC, NAAC, HIGHER EDUCATION. UNESCO

**प्रास्ताविक:**

प्रा सुधाकर मानकर सर यांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात वाणिज्य शाखेमध्ये प्राध्यापक म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.नॅकच्या पहिल्या मूल्यांकनातही त्यांनी समन्वयक म्हणून चांगले काम केले आहे. शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक संघटना ( सुटा)मध्येही त्यांनी 50 वर्षे कार्य केले आहे. एम.फुक्टो , ए. आय. फुक्टोमध्येही त्यांनी उत्कृष्ट काम करून UGC सारख्या देशपातळीवर उच्च शिक्षणामध्ये काम करणाऱ्या संस्थेलाही मार्गदर्शन केले आहे.

**उद्दिष्टे:**

1.प्राचार्य सुधाकर मानकर सर यांचे शहाजी महाविद्यालयातील कार्य जाणून घेणे
2.त्यांचे शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक संघटना (सुटा) मधील कार्याची माहिती करून घेणे
3.प्रा.सुधाकर मानकर सर यांनी देशपातळीवरील उच्च शिक्षण विषयक प्रश्नांच्या सोडवण्यासाठी केलेले कार्य जाणून घेणे
4.प्रा.सुधाकर मानकर सर यांचे जागतिक प्राध्यापक महासंघातील कार्य समजून घेणे.
5.त्यांचे लेखन विषयक कार्य जाणून घेणे.
6.मानकर सरांचे कौटुंबिक क्षेत्रातील मार्गदर्शन जाणून घेणे.

प्रा. सुधाकर मानकर सरांची जन्मभूमी अमरावती मधील. 21 डिसेंबर 1948 चा त्यांचा जन्म. अत्यंत सधन अशा कुटुंबात त्यांच बालपण गेले.1979 साली सरांनी नागपूरच्या जीएस कॉलेजमधून वाणिज्य शाखेतून प्रथम श्रेणीत पदवी संपादन केली. त्यांना एकाच वेळी प्राध्यापक म्हणून नोकरीचे चार महाविद्यालयातून बोलावणे आले. पुणे विद्यापीठातील नाशिक जवळील संलग्नित महाविद्यालयात पाच वर्षे त्यांनी प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे काम केले. त्यानंतर त्यांना कोल्हापुरातील रंकाळयावरील शालिनी पॅलेस या राजवाड्यातील श्रीपतराव बोंद्रे दादा यांच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात कॉमर्स विभागाकडे प्राध्यापक म्हणून त्यांना नेमण्यात आले. 1974 -75 साली श्रीपतराव बोंद्रे दादा आणि प्राचार्य आबासाहेब शिंदे यांनी मानकर सरांच्या बरोबरच डॉक्टर जयसिंगराव पवार, प्रा. के. एच. ठक्कर,,प्रा.पंगु,प्रा.केचे, प्रा. चंद्रकुमार नलगे प्रा.रघुनंदन वराडकर, डॉ. नशिराबादकर, डॉ. रजनी भागवती यांच्यासह दहा नवीन प्राध्यापकांची एकाच वेळी नियुक्ती केली. त्यांच्या अध्ययन अध्यापनाच्या प्रभावामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या दुसऱ्याच वर्षी 170 वरून 700 वर गेली तर तिसऱ्या वर्षी ती 1500 वर गेली. त्यांनी या शहाजी महाविद्यालयात 34 वर्षे अखंडपणे, प्रामाणिकपणे अध्यापनाचे कार्य केले. दरम्यान त्यांनी अमरावतीच्या बडनेर महाविद्यालयात प्रमोशन वरती दोन वर्षे प्राचार्य म्हणूनही काम केले. त्यावेळीचे मंत्री राम मेघे यांनी मंत्री श्रीपतराव बोंद्रे दादा यांना सांगून त्यांना प्रमोशन वरती बडनेर महाविद्यालयाच्या जडन घडणीसाठी त्यांना बडनेरला बोलावून घेतले..तिथेही त्यांनी उत्तम काम केले.



Scanned with ACE Scanner

कोल्हापुरात आल्यानंतर मानकर सरांना शहाजी महाविद्यालयातील उपप्राचार्य संभाजीराव जाधव यांचा सहवास व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्याने,मार्गदर्शनाखाली सरांनी शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक संघटनेतील कार्यात स्वतःला झोकून दिले. 1974 पासून ते आज पर्यंत अखंडपणे कार्य ते करीत आहेत.

सुरुवातीला सुटा संघटनेचे सदस्य, जिल्हाध्यक्ष, सचिव, महाराष्ट्र पातळीवरील एम फुक्टो प्राध्यापक संघटने मधील विविध पदांवर त्यांनी काम करून महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाविषयी प्रश्नांच्या सोडवण्यासाठी हिरीरीने काम केले. पुढे बारा वर्षे अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे त्यांनी जनरल सेक्रेटरी म्हणून हे काम केले. या कालावधीत त्यांनी युजीसी आणि भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातील उच्च शिक्षणाविषयी विविध प्रश्नांच्या सोडवण्यासाठी, नवीन धोरणे आणि उच्च शिक्षणाची वाढ व विकास यासाठी अखंडपणे मार्गदर्शन केले.

यातूनच त्यांनी महाविद्यालयातील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांना शिक्षक समकक्षता मिळवण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी युजीसी कडे दहा बैठका घेऊन याचा पाठपुरावा केला.

सुरवातीला प्राध्यापकांना 300 ते 600 अशी वेतन श्रेणी होती. त्यांना प्रमोशन नव्हते. प्रमोशन आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मानकर सरांनी अखंड कार्य केले. या कार्यासाठी कोलकत्याचे अशोक बरमन, मृण्मय भट्टाचार्य, ओरिसाचे गोपाल नंदा, हैदराबादचे विजयकुमार, चंदिगडचे एन. के. तिवारी, कोल्हापूरचे संभाजीराव जाधव आणि इतर सहकाऱ्यांची मोठी साथ मिळाली.
यामुळे प्राध्यापकांच्या वेतनश्रेणी प्रश्न मार्गी लागला, उच्च शिक्षणात विद्यार्थी संख्या वाढली.

सरांना पुढे जागतिक प्राध्यापक महासंघाचे पाच वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. 2010 ते 2015 या कालावधीत त्यांनी जागतिक पातळीवरील युनेस्को सारख्या जागतिक संस्थांना उच्च शिक्षणाच्या बाबतीत, विविध प्रश्नांवर मार्गदर्शन केले. याचा उपयोग विकसनशील आणि गरीब राष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या वाढीसाठी झाला.

हे कार्य करीत असताना त्यांनी लेखनाची सवय ही स्वतःला जडवून घेतली. 1994 पासून त्यांनी वाणिज्य शाखेतील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 165 पुस्तकांचे लेखन केले. या पुस्तकांमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी, प्राध्यापक घडले. यातून मिळणारा मोबदला थोडका होता परंतु वाणिज्य शाखेत विद्यार्थी शिकण्यासाठी आणि ते पुढे जाण्यास या पुस्तकांमध्ये प्रोत्साहन मिळाले. विद्यार्थ्यांन बरोबर ग्रामीण भागातील प्राध्यापकांना या पुस्तकाचा मोठा लाभ झाला. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये यातील काही पुस्तके संदर्भ पुस्तके म्हणून निवडण्यात आलेली आहेत. याबरोबरच त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग केंद्र, राज्य सरकारच्या उच्च शिक्षणाविषयक अध्यादेशांचेही प्राध्यापक विश्वच्या माध्यमातून प्रसारण केले.सुमारे 35 वर्षे त्यांनी प्राध्यापक विश्व या नियतकालिकाच्या संपादक पदाची जबाबदारी सांभाळली आहे.या सर्व संकलित झालेल्या शासकीय जीआर चे त्यांनी 24 पुस्तकात संपादन केले आहे..ही सर्व पुस्तके मंत्रालयातील सचिवापासून ते सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, प्रबंधकांच्या पर्यंत संदर्भासाठी उपलब्ध आहेत. यातून विद्यार्थ्यांच्या बरोबर, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील पदाधिकारी, अधिकारी व शासनाच्या अधिकारी यांनाही संदर्भ मूल्य असणारा दस्तऐवज मिळाला आहे. तसेच त्यांनी कौशल्य विकास आणि व्यक्तिमत्व विकास यावरही दोन पुस्तके मराठीत, इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध केलेले आहेत.

शहाजी महाविद्यालयातील नॅकच्या पहिल्या मूल्यांकनात समन्वयक म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केले व महाविद्यालयाला उच्च श्रेणी मिळवून देण्यात त्यांचा सहभाग राहिला हे कार्य करत असताना त्यांनी मुलांच्या शिक्षणाकडेही लक्ष दिले.त्यांच्या दोन्हीही मुली उच्च विद्या विभूषित असून दोन्हीही जावई चांगल्या ठिकाणी कार्यरत आहेत.

त्यांचा मुलगा डॉक्टर अतुल हे आयुर्वेदामध्ये एम.डी.असून त्यांनी आयुर्वेदातील पीएच.डी.पदवी संपादन केलेली आहे. त्यांनी दोन आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून ही काम केलेले आहे. सुनबाई डॉ.दिपती याही बीएएमएस व एम.डी.आयुर्वेदामध्ये आहेत. त्यांचाही स्वतंत्रपणे वैद्यकीय व्यवसाय आहे. सरांना सहा नातवंडे व मोठा कौटुंबिक परिवार आहे. सर्वांच्या विकासासाठी ते सतत मार्गदर्शकाची भूमिका निभावतात .

या 75 वर्षांच्या कालावधीमध्ये सरांना श्रीपतराव बोंद्रे दादा, डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. संभाजीराव जाधव , प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. वामन कटांबळे , प्राचार्य डॉ.डी.आर.मोरे, डॉ.आर.के.शानेदिवाण यांचाही त्यांना सहवास लाभला, आई-वडिलांची, पत्नीची ही त्यांना चांगली साथ लाभली.त्यांचा महाविद्यालयामध्ये आणि महाविद्यालयाच्या बाहेरी मोठा मित्रपरिवार आहे. विद्या विनयन शोभते असे नम्र व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. मानकर सर होय. उच्च शिक्षणातील ते चालते बोलते विद्यापीठ आहे .

**समारोप:**

प्रा सुधाकर मानकर सर यांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात वाणिज्य शाखेमध्ये प्राध्यापक म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.नॅकच्या पहिल्या मूल्यांकनातही त्यांनी समन्वयक म्हणून चांगले काम केले आहे. शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक संघटना ( सुटा)मध्येही त्यांनी 50 वर्षे कार्य केले आहे. एम.फुक्टो , ए. आय. फुक्टोमध्येही त्यांनी



Scanned with ACE Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

उत्कृष्ट काम करून UGC सारख्या देशपातळीवर उच्च शिक्षणामध्ये काम करणाऱ्या संस्थेलाही मार्गदर्शन केले आहे. शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपालांच्या वेतनप्रश्नही अनेक बैठका घेऊन त्यांना प्राध्यापकपदाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी 165 हून अधिक ग्रंथांचे लेखन केले आहे उच्च शिक्षणातील विविध अध्यादेश मिळवून त्यांनी 24 पुस्तकाद्वारे त्यांचे प्रकाशन केले आहे. वयाच्या 75 वर्षात ही ते उच्च शिक्षणातील विविध प्रश्नांच्या सोडवण्यासाठी अखंडपणे आणि निरपेक्षपणे प्रयत्नशील असताना दिसतात. उच्च शिक्षणातील ते उत्कृष्ट सल्लागार मार्गदर्शक आणि दीपस्तंभ आहेत.

संदर्भ :

1:मानकर सुधाकर ( 2022), उच्च शिक्षण विषयक नवीन शैक्षणिक धोरण -2020 (इंग्रजी व मराठी संयुक्त) ,अतुल पब्लिकेशन कोल्हापूर.

2.प्रा.सुधाकर मानकर सर यांची मुलाखत, 20-09-2023.



Scanned with ACE Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318




Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's

# SHRI SHAHAJI CHHATRAPATI MAHAVIDYALAYA

Accredited by NAAC with Grade 'A' (CGPA-3.13)
2968, 'C' Ward, Dasara Chowk, Kolhapur- 4169002 (M.S.)
Phone : (0231)-2644204, Fax : 90231)-2641954
Affiliated to : Shivaji University, Kolhapur- 416004 (M.S.)

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR

ON

## Sustainable Development in India: Strategies & Emerging Trends in Businesses

Saturday 16th March 2024

Organized by

**Department of Commerce & IQAC**

Venue

**MAHARSHI V.R. SHINDE AUDITORIUM**
**Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

: Cheif Editor :

Principal Dr. R.K. Shanediwan
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

: Editor :

Mr. S. H. Kamble
(Head, Dept. of Commerce)

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with ACE Scanner

28) IMPACT OF GREEN INNOVATION ON CORPORATE SUSTAINABILITY
**Dr. Anita Yadav, Kolhapur** || 130

29) Building a Sustainable Future: Responsible Investing Strategies in India
**Shrikant Vasant Bacche, Kolhapur** ||134

30) साहस पर्यटनाच्या माध्यामातून शाश्वत विकास
**डॉ. सुरेश वसंत शिखरे, कोल्हापूर** ||136

31) शाश्वत विकास : ध्येये आणि जागतिक परिस्थिती
**डॉ. विजय जालिंदर देठे, दसरा चौक, कोल्हापूर** ||143

32) एकविसाव्या शतकातील भारताच्या शाश्वत विकासासाठी योगदान
**डॉ. अजितकुमार भिमराव पाटील, कोल्हापूर** ||147

33) खेल – शाश्वत विकास का एक महत्वपूर्ण प्रवर्तक
**Capt. Dr- Prashant Bibhishan Patil, Kolhapur** ||153

34) आदिवासी जनजीवन के परिप्रेक्ष्य में 'ग्लोबल गाँव के देवता'
**डॉ. सारिका राजाराम कांबळे, कोल्हापुर** ||156

35) सामाजिक उत्तरदायित्व से बेखबर कार्पोरेट जगत
**प्रो. डॉ. सरोज पाटील, कोल्हापुर** ||159

36) शाश्वत विकाससाठी आमचे शेतीतील काही प्रयोग
**डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील, कोल्हापूर** ||163

37) INNOVATION AS A BOOSTER OF RURAL ENTREPRENEURSHIP: A CASE....
**Dr. Ramdas N. Bolake, Kankavli, Dist- Sindhudurg** ||168

38) Sustainable Agricultural development for inclusive economy....
**Milind. M. Shinde, Dr. Anup Mule** ||173

39) Eco-Friendly Tourism in India: Promoting Sustainable Hospitality
**Nikita Nitin Urunkar, Kolhapur** ||177

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with ACE Scanner

पर लगातार ग्लानि और खेद से
हम उनके सामने कर देते है। जेबें खाली
(कविता –'नया बैंक')

अब बाजार ग्राहक वर्ग को अपनी शिकार बनाने के एकमात्र उद्देश्य से ही सजाए जाते है। ग्राहक जरुरत हो या न हो परंतु वस्तु की आकर्षकता देख उसे खरीदने के लिए बाध्य बन जाता है। पर यह सबसे बडी खेद जन्य बात है कि बहुत कुछ खरीदने के बाद भी ग्राहक के मन में और अधिक खरीदने का लालच बना रहता है।

हम उनके सामने कर देते हैं जेबे खाली
फिर अपने घर को एक करुण दृष्टिसे देखते हैं
अभी बहुत कुछ हम नहीं ला पाए
की शर्म और क्षोभ के साथ
(कविता – 'नया बैंक')

यह बाजारवाद की जीत है कि वह बडी मात्रा में उपभोक्ता संस्कृति के निर्माण में शतप्रतिशत सफल बना है। बाजारवाद ने कार्पोरेट गव्हर्नेंस के सिद्धान्तो को मिटा दिया हैं। बडी मात्रा में ग्राहक वर्ग का निर्माण करना ही कार्पोरेट जगत का लक्ष्य बना हुआ है।

**निष्कर्ष :**

भूमंडलीकरण ने पूरे विश्व में अपनी जडे जमा ली है। जहां पर प्रतिस्पर्धी दिमाग को पीछे ढकेल कर आगे बढने की होड और विकास की अत्याधिक इच्छा के समन्वय में बाजारवाद को बढावा मिला है। कार्पोरेट जगत अधिकाधिक रूप में विस्तारित होता जा रहा है। कार्पोरेट जगत को अपने सामाजिक उत्तरदायित्व का भूलावा हो गया है। ऐसे मे पनप रही उपभोक्तावादी संस्कृति का भविष्य क्या होगा ? इस पर प्रश्न चिन्ह उपस्थित है।

**संदर्भ ग्रंथ –**

➤ २१ वी शती का वैश्विक हिंदी साहित्य: डॉ. ललिता राठोड, डॉ. ओमप्रकाश झंवर
➤ वागार्थ मासिक पत्रिका – अंक २२७, जून २०१४
➤ बाजार – जया जादवानी
➤ नया बैंक – मंगलेश डबरालट छत्रपति महाविद्यालय, कोल्हापुर

❑❑❑

36

# शाश्वत विकाससाठी आमचे शेतीतील काही प्रयोग

डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील
ग्रंथपाल, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर

**********

**सारांश :**

शाश्वत विकास, शाश्वत पर्यावरण, जागतिक तापमान वाढ या व अशा संकल्पना बाबत आपण नेहमीच ऐकतो. याबाबत लोकांनी असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे, देशाने असे केले पाहिजे, जगन असे केले पाहिजे अशी अपेक्षा आपण बाळगतो. पण त्याची सुरुवात आपणापासून केली तर ते अधिक संयुक्तिक होईल हा विचार करून आमच्या शेतीमध्ये व अवतीभोवती आम्ही काही प्रयोग केले आहेत. शाश्वत विकाससाठी ते निश्चितच उपयुक्त आणि मौलिक योगदान देणारे असे आहेत. ते छोट्या स्वरूपात असले तरीही कायमस्वरूपी पर्यावरणाचा समतोल राहून विकासासाठी ते उपयुक्त ठरणारे असे आहेत. यामध्ये बांबू लागवड, पिंपळ आणि वडाची झाडांची लागवड, नारळच्या झाडांची लागवड, शेतीच्या बांधांवरती ठेवलेली वृक्ष संपदा, ५० लाख लिटर क्षमतेचे शेततळे, उसाचा पाला न पेटवता त्याचे केलेले कंपोस्ट, हळद लागवड, चिकू लागवड, देशी केळीची लागवड, पावसाचे पडणारे पाणी शेतीमध्ये आणि विहिरीमध्ये साठवणे (रेन हार्वेस्टिंग) या व इतर प्रयोगांचा समावेश आहे. याची थोडक्यात माहिती या पेपर मध्ये दिलेली आहे.

**शोध संज्ञा :** शाश्वत विकास, पर्यावरण समतोल, रेन हार्वेस्टिंग, गांडूळ खत, नॅचरल कंपोस्ट.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेणे.

२. शेतीमधील वैयक्तिक प्रयोगाची माहिती घेणे व त्याचे विवेचन करणे.

३. तापमान वाढ रोखण्यासाठी वैयक्तिक व



Scanned with ACE Scanner

कौटुंबिक पातळीवर प्रयत्न करणे.

**प्रस्तावना :**

शाश्वत विकास म्हणजे चिरकाल टिकणारा विकास होय. औद्योगिकरण, शहरीकरण, झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल या व इतर कारणामुळे अनेक पर्यावरण विषयक प्रश्न निर्माण झालेले आहेत. नैसर्गिक चक्रामध्ये वृक्षारोपण करणे, पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते विहिरीमध्ये घेणे व जमिनीत ते मुरवणे तसेच शेततळ्याच्या माध्यमातून वॉटर बँक तयार करून वर्षभर पाणी झाडांना पुरेल अशा स्वरूपात ते शेततळ्यामध्ये साठवणे या व इतर प्रयोगांचा या आमच्या शेतीच्या समावेश आहे.गेले ३० ते ३५ वर्षे हे प्रयोग आम्ही अखंडपणे सुरू ठेवलेले आहेत. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील कवठेमंकाळ तालुक्यातील कुची हे आमचे ४००० लोकवस्तीचे खेडेगाव. या गावांमध्ये आमची २३एकर शेती आहे. संयुक्त कुटुंब पद्धती असल्यामुळे घरात १७ माणसे आहेत. वडील, चुलते, आजी, भाऊ, वहिनी आणि चुलत भाऊ, त्यांची फॅमिली व काका, काकी व आमची मुले असा मोठा एकत्रित कुटुंबाचा परिवार आमच्या घरी आहे.

शेती म्हटले की त्यास मनुष्यबळाची आवश्यकता असते. हे मनुष्यबळ आमच्या कुटुंबातच उपलब्ध असल्यामुळे घरातील झोपी छुपी बेकारी कमी होती. प्रत्येकाच्या हाताला काम होते आणि शेतीतून नवीन नवीन उत्पादनाची यामध्ये भर पडत होती. आमचा दुष्काळी भागात असल्यामुळे तीनशे ते सहाशे मिलिमीटर इतकाच पाऊस. या पडणाऱ्या पावसावरच जिरायत आणि बागायत शेती आम्ही करत होतो. आजोबा पणजोबा पासूनच केवळ दोन एकर बागायत शेती आणि २० —२२ एकर जिरायत शेती होती. बागायत शेतीमध्ये एकरभर हळद, अर्धा एकरभर ऊस अशी पिके घेतली जाई. उरलेली सगळी शेती पावसावरच अवलंबून होती. त्यामुळे खरीपातील ज्वारी, बाजरी, मका अशी पिके आणि मूग, मटकी, तूर अशी पिके [illegible] सप्टेंबर ऑक्टोबर पर्यंत ही पैकी काढणीला येत असत. तीन—चार महिन्याच्या या कालावधीमध्ये ही पिके पक्व होऊन उत्पादन मिळत असे.उर्वरित सात ते आठ महिने शेती ही पडीक रहत असे.परंतु कुटुंबाची वाढलेली लोकसंख्या, आर्थिक उन्नतीसाठी आणि शेतीमध्ये झालेले यांत्रिकीकरणामुळे दोन एकर बागायत शेतीचे आम्ही १० ते १२ एकर बागायत शेतीमध्ये रूपांतर केले. आता त्यासाठी पाण्याची व्यवस्था करावी लागली. पूर्वी दोनच विहिरी होत्या. परंतु त्यानंतर आम्ही परत दोन विहिरी पाडल्या आणि तीन कुपनलिकांची खुदाई केली. यातून पुरेसे पाणी या दहा—बारा एकर क्षेत्रासाठी पुरू लागले. परंतु १९७२ चा दुष्काळ, १९८४, ९२ आणि त्यानंतर २००४ आणि २०१२,१३ चा दुष्काळ आणि २०२३ मध्ये अपुरा पाऊस या नैसर्गिक गोष्टीमुळे शेतीचा विकास शाश्वत स्वरूपाचा राहिला नाही. त्यात अनेक चढउतार आले. पिण्याचा पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न या व इतर अनेक समस्या निर्माण झाल्या. शेतीचे आर्थिक गणित पूर्णपणे मोडून पडले गेले. या सर्व गोष्टीवर, या सर्व घटकांवर काम करत असताना प्रचंड मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत होती. पाणी व्यवस्थापना वरती मोठा ताण येत होता. निसर्गातून पावसाचे पडणारे पाणी कमी आणि वर्षभर बारमाही पिकासाठी लागणारे पाणी जास्त लागत होते.

आमचे कवठेमंकाळ सह दुष्काळी भागामध्ये २००४ च्या दुष्काळामध्ये हेलिकॉप्टर व विमानांमधून सल्फर डाय ऑक्साईड व इतर फवारण्या करून कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यात आला. त्यास दहा टक्के यश आले. परंतु ते पुरेसे नव्हते. त्यासाठी शेतीत वेगळे प्रयोग करावे लागले. प्रयोगाची माहिती पुढे दिलेली आहेच.

अगोदर शाश्वत विकास म्हणजे काय आपण ते पाहू. मराठी विश्वकोशामध्ये शाश्वत विकासाबाबत पुढील माहिती दिलेली आहे.

**सस्टेनेबल डेव्हलपमेंट/शाश्वत विकास :**

भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा पोहोचू न देता वर्तमानकाळातील गरजा पूर्ण [illegible] शाश्वत विकास ध्येये (इंग्रजी: Sustainable Development Goals; लघुरूप:एस.डी.जी.) हा भविष्यकालीन



Scanned with ACE Scanner

आंतरराष्ट्रीय विकास संबंधित ध्येयांचा संच आहे. ही ध्येये युनायटेड नेशन्स ने बनविली असून त्यांची शाश्वत विकासासाठिची जागतिक ध्येये अशी बढती करण्यात आलेली आहे. या ध्येयांनी, सहस्र (मिलेनियम) विकास ध्येये ज्यांची मुदत वर्ष २०१५ च्या शेवटी संपली. वर्ष २०१५ पासुन २०३० पर्यंत ही ध्येये लागू पडतील. एकूण १७ ध्येये असून या ध्येयांसाठी १६६ विशिष्ट ध्येयेआहेत. युनोस्को सदस्यांनी स्वीकारलेल्या शाश्वत विकासासाठी २०३० अजेंडा, जागतिक शाश्वत विकास उद्दिष्टे ( SDGs ) तयार केली. ते लोकांसाठी आणि ग्रहासाठी शांतता आणि समृद्धी... या उद्देशाने तयार केले गेली. ते म्हणतात की गरिबी संपवणे, आरोग्य आणि शिक्षण सुधारणे, असमानता कमी करणे, आणि आर्थिक वाढ — हवामान बदलाचा सामना करताना आणि महासागर आणि जंगले जतन करण्यासाठी कार्य करताना. SDGs त्यांच्या केंद्रस्थानी शाश्वतता ठेवून शाश्वत विकासाच्या परस्परसंबंधित पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक पैलूंवर भर देतात. युनोस्कोने शाश्वत विकासासाठी काही वरील काही निकष दिलेले आहेत. त्याचा परिणामही आपल्या स्थानिक पातळीवरील प्रयोगामध्ये दिसून येतो.

**शाश्वत विकास सबंधी आमचे काही प्रयोग**

**१. शेततळ्याची निर्मिती :** चार महिने पाऊस आणि आठ महिने उन्हाळा. चार महिन्यातील एक, दोन महिनेच पाऊस, त्यात पडणारे पाणी व्यवस्थित बँकेत पैसे ठेवतात त्याप्रमाणे ठेवले तर वर्षभर अडचणच्या वेळी हव्या त्या वेळी त्या पाण्याचा आपल्याला द्राक्ष बागा, झाडे यांचे जतन करण्यासाठी उपयोग होतो. मोठ्या दुष्काळात तर ही शेततळी खूप मोठा आधार ठरतात. शासनाच्या शेततळे धोरणाचा लाभ घेऊन आम्ही आमच्या शेतीमध्ये सदर अडीचशे फूट रुंद, अडीचशे फूट लांब व तीस फूट खोलीचे शेततळे तयार करून त्यामध्ये प्लॅस्टिक कागद अंथरून त्यामध्ये पाण्याचा साठा केलेला आहे. अडचणीच्या साधारण सहा सात महिने हा पाण्याचा साठा १०एकर शेतीला, त्यातील दोन एकर द्राक्ष बागेला उपयुक्त ठरतो. इतर झाडांनाही अडचणीच्या वेळी यातून पाणी दिले जाते. सुमारे ५० लाख लिटरचे हे शेततळे आहे.

**रस्त्याकडील दोनशेहून अधिक झाडांचे संवर्धन :** आमची आगळगाव हद्दीमध्ये सुमारे १६ एकर शेती आहे. या शेतीमधून आगळगाव ते कवठेमंकाळ असा रस्ता जातो. पूर्वी हा रस्ता ओसाड होता. परंतु आम्ही तीस वर्षापासून शेती करायला गेल्यानंतर त्या रस्त्याकडला आम्ही पूर्ण झाडे संरक्षित करून घेतली आणि शेळ्या मेंढ्या राखणारी गुराखी यांच्यापासून या झाडांना कोणती इजा होणार नाही याची काळजी घेतली. बाभूळ, चंदन लिंब, सिताफळ व इतर झाडे आम्ही न तोडता कायमस्वरूपी जतन करून ठेवली. इतर रस्त्यावरील गुराख्यांनाही याबाबत कल्पना दिली व ही झाडे आम्ही कायमस्वरूपी ठेवणार असून ही झाडे, यांच्या फांद्या तोडू नयेत, झाडे तोडू नयेत असे आवाहन करून त्यांना समजून सांगितले. यामुळे या आमच्या शेतीच्या बांधांवरती आणि रस्त्याकडेला साधारण ३०० हून अधिक वेगवेगळी झाडे आहेत. यातून पर्यावरणाचे मोठे संरक्षण होऊन शाश्वत विकासाला मदत झालेली आहे. काही वेळा चंदनचोर या झाडांमधील चंदनाची झाडे तोडून नेतात परंतु पर्यावरण इतके चांगले आहे की तोडलेल्या झाडातुही परत पालवी फुटून नवीन झाडे तयार होतात. फक्त ती मुळासहित काढता कामा नयेत. पक्षांनी चंदनाची अनेक बिया खाल्ल्याने अवतीभोवती पडलेल्या आहेत, त्यातूनही सुमारे पन्नास हुन अधिक चंदनाची झाडे आलेले आहेत. ती जतन करून ठेवलेली आहेत. सुमारे दीडशेहून अधिक मोठमोठ्या बाभळीची झाडे तसेच लिंबाची झाडे ही जतन करून ठेवलेले आहेत. आज ही झाडे बघताना भूतकाळ आठवतो. ही झाडे आम्ही मुलासारखी जतन केलेले आहेत.

कुची व आगळगाव या दोन गावांमध्ये आमची शेती असून साधारण सात ठिकाणी सात वेगवेगळ्या ठिकाणी ही शेती तुकड्या तुकड्या स्वरूपात आहे. परंतु या सर्व शेतीच्या बांधांवरची झाडे आम्ही कायमस्वरूपी जतन करून ठेवलेले आहेत. त्यामुळे जिथे झाड जास्त तेथे आमची शेती असे सूत्र झालेले आहे. यातून लाखो लिटर ऑक्सिजन तसेच इतर पर्यावरण पर्यावरण पूरक गोष्टींची निर्मिती होते. आमचे आरोग्य व गावाचे, समाजाचे निसर्गाचे, शेतीचे, आरोग्य



Scanned with ACE Scanner

ही चांगले राहिलेले आहे.

**बांबू लागवडीचा प्रयोग :**

आमच्या दोन मळ्यांमध्ये आम्ही बांबू लागवडीचा यशस्वी प्रयोग केलेला आहे. कुची येथील आमच्या घराभोवती दोन एकर शेती आहे, या दोन्ही शेतीच्या भोवती आणि आमच्या घराच्या अवतीभवती कागलच्या शासकीय रोपवाटिकेतून व इतर ठिकाणाहून आम्ही बांबूची रोपे घेऊन ती लावलेले आहेत. साधारण तीनशे रोपे बांबू लावलेले आहेत. त्यापासून आता हजारो बांबू तयार झालेले आहेत. कोणते खत, पाणी न देता पाण्याच्या पाटाभोवती आणि रस्त्याच्या कडेला ही बांबू शेती केलेली आहे. अत्यंत पर्यावरण पूरक अशा स्वरूपाची ही शेती आहे. या बांबू शेतीतून आम्हाला बांबूच्या काठ्या, बांबू रोपे तसेच हिरवीगार सावली मिळते. हवेच्या झोलावरती झुलणारे हे बांबू पाहून मन प्रसन्न होते. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि हिरवागार परिसर बघून आमच्याबरोबरचे इतरांचे मन हे प्रसन्न राहते.

**हळद लागवडीचे प्रयोग :**

आजोबा पंजोबापासून आम्ही शेतीतून सोने पिकवत आहोत. अर्थात ती हळद पिकवत आहोत. लहानपणी आम्ही एक म्हण नेहमी म्हणत असे, सोन्याची सुरी भुईत पुरी वर पटकार गमजा करी.... याचा अर्थ सोन्याची सुरी आपण भुईत पुरून त्यातून सोनेरी हळद आपण उत्पादन करतो. सांगलीच्या हळद मार्केटमध्ये आम्ही किती तर वेळा ही हळद टेम्पोने पाठवलेली आहे. या हळदीच्या प्रयोगातून आमच्या घराची आर्थिक उन्नती तर झालेलीच आहेच, पण जमिनीची मृदू संधारण आणि नैसर्गिक मातीचा पोथ चांगला राहिलेला आहे.या हळद पिकाच्या नंतर येणारी तीन चार पिके शेतीतून हमखास पीक देतात आणि आर्थिक शाश्वत स्वरूपाची शेती पिकते. वड, पिंपळ आणि जांभळाची झाडे ही आम्ही लावलेली आहेत. साधारण २५ हून अधिक झाडे आमच्या शेतीभोवती आज डोलताना दिसतात. पिंपळाला आम्ही विष्णूचे वस्तीस्थान आहे असे संबोधतो, ज्ञानेश्वर माऊलींचे आणि आमच्या वारकरी संप्रदायाचेही पिंपळाचे जवळचे नाते आहे. अमच्या रस्त्याकडला भला मोठा पिंपळ आहे, तो तोडण्याचा अनेकांनी घाट घातला होता. परंतु आम्ही त्यास न जुमानता हे झाड कायमस्वरूपी ठेवलेले आहे. या पिंपळाच्या झाडामुळे दहा गुंठे शेती पडते, परंतु त्याचा उपयोग अख्या गावाला शुद्ध ऑक्सिजन मिळण्यासाठी होतो, पिंपळाच्या झाडाप्रमाणे वडाची पाच—सहा झाडे आम्ही लावलेली आहेत. पण ती छोटी आहेत, लहानपणापासून आम्ही उंबराच्या झाडावरती खेळलो बागोडलो आणि त्याची उंबर खाल्ली, उंबरे चविष्ट आणि आरोग्यवर्धक असशी आहेत. कालवणाला भाजी म्हणून उंबराच्या दोड्या ही खूप छान लागतात. उंबराच फुल पाहणारा माणूस खूप भाग्यवान असतो असे आमचे वडील सांगत असत. आम्ही उंबराचे फुल पाहिल्याचे ते सांगतात. उंबर देखील दत्त महाराजांचे वस्तीस्थान आहे. आमच्या शेतीत अशी साधारण ११ उंबराची वेग वेगळ्या ठिकाणी झाडे आहेत. त्याचे आम्ही जतन केलेले आहे. आमच्या घर, शेती भोवती जांभूळ, चिंच यांची मोठी झाडे आहेत. त्याचबरोबर आंब्याची आणि पेरवाची मोठी झाडे आहेत .

**नारळ शेतीचा प्रयोग :**

आम्ही लहान असताना कवठेमंकाच्या श्री महांकाली सहकारी साखर कारखान्यातून दहा रुपये ला एक याप्रमाणे वीस नारळाची रोपे घेतलेली होती व त्याची लागवड केलेली होती. या नारळाच्या झाडातून आम्हाला प्रचंड उत्पादन मिळालेले आहे. त्यापैकी १४ नारळाची झाडे आमच्याकडे आजही डौलाने डौलाने उभी आहेत. गेली ३०—३५ वर्षे ते आम्हाला उत्पादन देतात.

**ऊस शेतीचे प्रयोग :**

ऊसातूनही आम्ही प्रचंड उत्पादन घेतलेले आहे. कवठेमंकाळ तालुक्यामध्ये आम्ही४१० टन ऊस काढलेला आहे. महांकाली साखर कारखान्याला सर्वाधिक ऊस पुरवठा करणारे शेतकरी म्हणूनही कुची गावांमध्ये आमची ओळख आहे. या उसा मधील पाला न पेटवता तो कायमस्वरूपी ठेवून त्याआधारे आम्ही शेतीचे, उसाचे उत्पादन घेतलेले आहे. ही शेतीची आवड आम्ही कोल्हापुरातही जपलेली आहे. कोल्हापूरच्या घराच्या टेरेसवर शेतीचे प्रयोग.



Scanned with ACE Scanner

कोल्हापूर येथील न्यू शाहूपुरी मध्ये आमचे मोठे लक्षद्वीप नगर अपार्टमेंट आहे. या अपार्टमेंटच्या टेरेसवर आम्ही मोठ्या मोठ्या कुंड्यांमध्ये आज ही विविध प्रकारच्या २०–२५ सून अधिक रोपांची लागवड केलेली आहे. वड, केळी, जांभूळ, सिताफळ, पेरू, फुलझाडे आणि फळझाडे यामध्ये आहेत. रोज पाणी घातल्याने आम्हाला समाधान मिळते. शेतीच्या या आवडीतून आम्ही अणुसुकुरा भागातील नदीकाठी परंतु डोंगर उतार वरती असणारी शेती पिकवत आहोत. शेतीची वाट काटेरी आणि प्रचंड खडतर असली तरीही शाश्वत विकास साठी आणि पर्यावरण रक्षणासाठी त्यातील आम्ही झाडे कायमस्वरूपी जतन करून ठेवलेली आहेत.यामुळे तापमान वाढ कमी होऊन निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होते. पाणी आडवा पाणी जिरवा, मृद संधारण व इतर अनेक फायदे या शेतीमध्ये झालेले आहेत.

आमचा जन्म शेतीत झाला असून मृत्यूही शेतीमध्येच होणार आहे. त्यामुळे आनंदाने हे शेतीचे व्रत जोपासलेले आहे.

पृथ्वी आप तेज वायू आकाश या पंचमहाभूतातून आपली निर्मिती झालेली आहे, त्यातच आपला अस्त होणार आहे. म्हणून त्यांचं संवर्धन करणं हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, केवळ भौतिक सुखे आणि पैशाच्या पाठीमागे न लागता, निसर्ग संवर्धन करून आनंद घेणे हे आपले खरं कर्तव्य आहे.

**समारोप :**

शाश्वत विकास साठी आपल्यापासून सुरुवात केली तर जग आणखी सुंदर होईल, पाणी प्रदूषण, इतर पर्यावरणीय समस्या दूर होऊन आपल्याला आनंदी जीवन जगता येईल, यासाठी आपल्यापासून ही सुरुवात करणे गरजेचे आहे. आमच्या शेतीत वेगवेगळे प्रयोग करून ही सुरुवात आम्ही केलेली आहे .

**संदर्भ :**

१.शिंदे जगन्नाथ, शाश्वत शेतीसाठी जमीन व पाणी व्यवस्थापन गोदावरी पब्लिकेशन नाशिक.

२.कुलकर्णी सुधीर श्रीधर शेतीची काटेरी वाट तेजस प्रकाशन कोल्हापूर.

३.वाद्रे अरुण, दिवस सोनियाचे बांबू शेतीचे, तेजस प्रकाशन कोल्हापूर.

चिपळूणकर प्रताप, नांगरणी शिवाय शेती, ध्रोवन कृषीमाला सकाळ प्रकाशन.

४. सावंत प्रकाश, पर्यावरण अभ्यास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. चिपळूणकर प्रताप, जमिनीची सुपीकता, सकाळ प्रकाशन कोल्हापूर.

❑❑❑



Scanned with ACE Scanner